**महाराष्ट्र शासन**

क्र: सवि-३५.२४/प्र.क्र.४०६/आस्था-१
सहकार, पणन व वस्त्राद्योग विभाग,
१२ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
**दिनांक :-१९ मार्च, २०२५.**

**प्रति,**

**संचालक (माहिती तंत्रज्ञान)**
**सामान्य प्रशासन विभाग**
**७ वा मजला, विस्तार इमारत**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**

Sub :- For Appointment of Two retired officers from Mantralaya Cadre Advertisement to be published on **20th March, 2025** on the website of the Government of Maharashtra.

**महोदय,**

उपरोक्त विषयासंदर्भात आपणास कळविण्यात येते की, या विभागाकरिता अनुभवी सेवानिवृत्त अवर सचिव यांच्या सेवा करार पद्धतीने उपलब्ध करून घेणेबाबतची जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाची असून सदर जाहिरात **दिनांक २० मार्च, २०२५ रोजी प्रकाशित करण्याची** विनंती आहे. सोबत जाहिरातीचा मजकूर जोडला आहे.

आपला ,

(योगेश वासनिक)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

# जाहिरात

**महाराष्ट्र शासन**
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
नवीन प्रशासकिय भवन, १२ वा मजला, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू,
चौक, मुंबई-४०० ०३२.

**सेवानिवृत्त अवर सचिव यांची आवश्यकतेनुसार करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरीता नामिकासूची (Panel) तयार करण्याबाबत.**

**विभागाची आवश्यकता :**

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागातील कामकाजाचा तसेच सेवा, आस्थापनाविषयक, माहिती व तंत्रज्ञान तसेच सहकार अधिनियमांशी संबंधित कामकाजाचा अनुभव असलेल्या (राजपत्रित) संवर्गातील अवर सचिव या पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांची खाली नमूद केलेल्या कामांसाठी आवश्यकतेनुसार करार पध्दतीने नियुक्ती करण्यासाठी नामिकासूची (Panel) तयार करण्याचे प्रस्तावित आहे :-

| अ.क्र. | आवश्यक पदे | कामाचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | २ | १. सहकार विभागाच्या क्षेत्रिय आस्थापनेवरील सेवा प्रवेश नियम अद्यावत करणे.<br>२. विभागाच्या तसेच क्षेत्रिय कार्यालयातील पदांचा आकृतीबंध निश्चित करणे.<br>३. विभागीय चौकशी प्रकरणांची छाननी करणे.<br>४. पदोन्नतीसाठी प्राप्त प्रस्तावांची छाननी करणे.<br>५. सहकार अधिनियमांत सुधारणा करणे<br>६. e-HRMS/e-office/Mahapar प्रणालींशी संबंधित विभागाचे कामकाज हाताळणे<br>७. इतर अनुषंगिक कामकाज |

**अटी व शर्ती :-**

१. सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. संकीर्ण-२७१५/ प्र.क्र.१००/१३.दिनांक १७ डिसेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करण्यात येणार आहे.
२. उमेदवार मंत्रालयीन प्रशासकीय विभागातील अवर सचिव या पदावरुन सेवानिवृत्त झालेला अधिकारी असावा.
३. उमेदवारास उपरोक्त कामकाजाचा किमान ३ ते ५ वर्षांचा अनुभव असावा.
४. उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान असावे.

५. उमेदवारास तंत्रज्ञानाचे चांगले ज्ञान असावे.
६. उमेदवाराचे वय ६५ वर्षांपेक्षा अधिक नसावे.
७. उमेदवार मुंबई अथवा लगतच्या जिल्हयात राहणारा असावा.
८. आवश्यक अर्हता धारण करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी सदर पदाकरिता विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.
९. उमेदवाराने सदर पदाकरिता वेबसाईटवरील माहितीचे अवलोकन करुन nitin.gaikwad68@nic.in या मेल आयडीवर जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून त्यांचे अर्ज १० दिवसांच्या आत सादर करावेत. या संदर्भात अधिक माहितीसाठी ०२२-२२०२९३१३ या दूरध्वनीवर संपर्क साधावा. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही. तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.
१०. विभागास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त अधिकारी यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जासंदर्भात शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.
११. मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार विभागाचा राहील.
१२. करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त अधिकाऱ्यांस सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई येथे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व वेळेत काम करावे लागेल.
१३. निवड करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांची नामिकासूची तयार करून विवक्षित कामाची निकड विचारात घेऊन त्यांचेमधून आवश्यक अधिकाऱ्यांची सेवा घेण्यात येईल.
१४. इतर अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील.

उप सचिव,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
महाराष्ट्र शासन

दिनांक : १९/०३/२०२५.
ठिकाण : मुंबई.